आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
६ फेब्रुवारी २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या स्वतःच्या अभ्यासाच्या शैलीवर विश्वास ठेवावा, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ‘परीक्षा पे चर्चा’ मधून आवाहन

- व्याजदर जैसे थे ठेवायचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय, अवैध ऑनलाईन व्यवहारांमुळे नुकसान झालेल्या बँक ग्राहकांना २५ हजार रुपये भरपाई द्यायचा प्रस्ताव

- राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी उद्या मतदान, नागपूर, नाशिक, धुळ्यासह इतर ठिकाणी महापौर-उपमहापौरांची निवड

**आणि**

- १९ वर्षांखालच्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताचं इंग्लंडसमोर विजयासाठी ४१२ धावांचं आव्हान

**<><><><><>**

प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या स्वतःच्या अध्ययन शैलीवर विश्वास ठेवावा असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज 'परीक्षा पे चर्चा' या संवादात्मक कार्यक्रमाच्या नवव्या आवृत्तीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि परीक्षेच्या काळात तणावातून मुक्त राहण्यासाठी मार्गदर्शन केलं. विद्यार्थ्यांनी पालक आणि शिक्षकांच्या सूचनांकडे नीट लक्ष द्यावं, त्यावर विचार करावा आणि स्वतःचे अनुभव आणि आकलन यांची सांगड घालून आत्मविश्वासानं परीक्षांना सामोरं जावं, असा सल्ला त्यांनी दिला. योग्य अभ्यास, निरीक्षण आणि ज्ञानाचा वापर केल्याशिवाय कोणतंही कौशल्य मिळवता येत नाही यावर त्यांनी भर दिला.

- ***- होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी- -***

- **<><><><><>**

विरोधकांच्या गदारोळामुळे आजही लोकसभेचं कामकाज आधी दुपारी १२ पर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. पुणे ते दिल्ली दरम्यान वंदे भारत, तेजस, राजधानी यासारख्या गाड्या सुरू कराव्यात, अशी मागणी राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी

यांनी शून्य प्रहरादरम्यान केली. सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या संमतीनं राज्यसभेचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीनं आज व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला. बुधवारपासून सुरू झालेल्या समितीच्या बैठकीतले निर्णय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज जाहीर केले. त्यामुळं रेपो दर सव्वा ५ टक्क्यांवर कायम राहणार आहे.

**होल्ड... बाईट- संजय मल्होत्रा**

अवैध इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहारांमुळं ग्राहकांना होणाऱ्या नुकसानावर मर्यादा आणण्यासाठी दिशानिर्देशांचा मसुदा रिझर्व्ह बँक जाहीर करणार आहे. त्यानुसार छोट्या रकमेच्या नुकसानीसाठी ग्राहकांना २५ हजार रुपयांपर्यंत नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव आहे. ही नुकसान भरपाई प्रत्येक ग्राहकाला एकदाच दिली जाईल. याबद्दलचे तपशील लवकरच दिले जातील, अशी माहिती गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली.

तसंच ज्येष्ठ नागरिकांच्या बँक खात्यातून ऑनलाइन व्यवहार करताना खबरदारीचे अतिरिक्त उपाय लागू करण्याचाही बँकेचा विचार आहे. याशिवाय बँकांचे वसुली एजंट तसंच दिशाभूल करुन ग्राहकांना विकल्या जाणाऱ्या विविध विमा आणि इतर योजनांच्या संदर्भात सुधारित दिशानिर्देशांचा मसुदाही रिझर्व्ह बँक लवकरच जाहीर करणार आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी उद्या मतदान होणार आहे. सकाळी साडे ७ वाजता मतदानाला सुरुवात होईल आणि संध्याकाळी साडे पाचपर्यंत मतदान सुरू राहणार आहे. या निवडणुकीची मतमोजणी सोमवारी, ९ फेब्रुवारीला होणार आहे. जिल्हा परिषदेच्या ७३१ जागांसाठी २ हजार ६२४ उमेदवार रिंगणात आहेत. तर पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ४ हजार ८१४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. जिल्हा परिषदेसाठी सर्वाधिक २९४ उमेदवार धाराशिवमध्ये तर पंचायत समित्यांसाठी सर्वाधिक ४९६ उमेदवार पुण्यातून निवडणूक रिंगणात आहेत.

**<><><><><>**

राज्यात विविध महानगरपालिकांच्या महापौर आणि उपमहापौरांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. काही महापालिकांमध्ये दोन्ही पदांवरचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. सविस्तर माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून...

**व्हीसी**

*(**कोल्हापूर** महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपच्या रूपाराणी निकम तर उपमहापौरपदी जनसुराज्य शक्ती पक्षाचे अक्षय जरग यांची निवड झाली आहे. त्यांनी काँग्रेसच्या दोन्ही उमेदवारांचा पराभव केला. **अमरावती** महानगरपालिकेच्या निवडणुकी महापौरपदी भारतीय जनता पक्षाचे श्रीचंद तेजवानी यांनी, तर उपमहापौर पदी युवा स्वाभिमान पक्षाचे नगरसेवक सचिन भेंडे यांनी विजय मिळवला आहे. **नागपूर** महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपच्या नीता ठाकरे तर उपमहापौर पदी भाजपच्याच लीला हातीबेड निवडून आल्या आहेत. त्यांनी काँगेसच्या उमेदवारांचा पराभव केला. **धुळे** महापालिकेच्या महापौर पदावर भाजपाच्या मायादेवी परदेशी यांची तर उपमहापौर पदावर ज्योत्सना प्रफुल्ल पाटील यांची आज बहुमताने निवड झाली. प्रतिस्पर्धी शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आणि एमआयएमच्या उमेदवारांचा त्यांनी पराभव केला.*

***जळगाव** शहर महानगरपालिकेच्या सतराव्या महापौर म्हणून भाजपच्या दीपमाला काळे यांची तर उपमहापौरपदी शिवसेनेचे मनोज चौधरी यांची आज बिनविरोध निवड झाल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलं. **अहिल्यानगर** महापालिकेच्या महापौर म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती गाडे आणि उपमहापौर म्हणून भाजपाचे धनंजय जाधव यांची बिनविरोध निवड झाली. **नांदेड** महापालिकेच्या येत्या १० तारखेला होणाऱ्या महापौर पदाच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष, एमआयएम आणि काँग्रेस- वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनी आज शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल केले. **जालना** शहर महापालिकेच्या महापौर पदासाठी आज भाजपकडून महापौर पदासाठी वंदना मगरे, तर उपमहापौर पदासाठी राजेश राऊत यांनी अर्ज दाखल केले. या दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. **सोलापूर** महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपाचे विनायक कोंड्याल आणि उपमहापौरपदी ज्ञानेश्वरी देवकर यांची बिनविरोध निवड झाली आहे.)*

**<><><><><>**

१९ वर्षांखालच्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतानं इंग्लंडसमोर विजयासाठी ४१२ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. झिंबाब्वेच्या हरारे इथं सुरू असलेल्या या सामन्यात भारतानं आधी फलंदाजी निवडून निर्धारित ५० षटकांमध्ये ९ गड्यांच्या मोबदल्यात ४११ धावा केल्या. वैभव सूर्यवंशीनं ५५ चेंडूंमध्ये शतकी खेळी करून या १९ वर्षांखालच्या विश्वचषकात दुसरं सर्वात जलद शतक झळकवण्याचा मान मिळवला. १५० धावांचा टप्पा फक्त ७१ चेंडूंमध्ये पार करून त्यानं या स्पर्धेत सर्वात वेगवान दीड शतकी खेळी करणारा फलंदाज हा विक्रमही आपल्या नावावर केला. वैभवनं बाद होण्यापूर्वी ८० चेडूंमध्ये १७५ धावांची झंझावाती खेळी केली.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या २२ षटकांत ६ बाद १७७ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या काही लाभार्थ्यांना ई-केवायसी करण्यासाठी सरकारनं ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या योजनेसाठी ई-केवायसी करण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत होती. त्यावेळी काही लाभार्थ्यांनी कुटुंबातला सदस्य सरकारी नोकरीत असल्यासंदर्भात चुकीच्या पर्यायाची निवड केली होती. या लाभार्थ्यांना योग्य पर्याय निवडण्यासाठी ३१ मार्चपर्यंत सरकारनं मुदतवाढ दिली आहे.

<><><><><>

नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्याची ओळख भारताचं हरित स्टील हब अशी तयार करायचा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसरात ॲडव्हांटेज विदर्भ २०२६ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते.

<><><><><>

दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचता यावं यासाठी ठाणे शहर वाहतूक पोलिसांनी विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थी वाहतूक कोंडीत अडकल्यास त्यांच्या मदतीसाठी वाहतूक पोलिसांचे ५४ रायडर्स तैनात केले जाणार आहेत.

<><><><><>

गेल्या २४ तासात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी  किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. येत्या दोन दिवसात राज्यात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**